# मुंबई विद्यापीठ

संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास
मंडळ यांचे कार्यालय
फोर्ट, मुंबई – ४०० ०३२

क्र. बीसीयुडी/आयसीडी/२०१६–१७/292

दिनांक २४ ऑगस्ट, २०१६

प्रति,
सर्व संलग्नित महाविद्यालय प्राचार्य

विषय : अवयवदान महा–अभियान दिनांक ३० ऑगस्ट ते १ सप्टेंबर, २०१६
संदर्भ : शासन निर्णय क्र. जागृती–०७१६/प्र.क्र. ३२/अधिनियम, दिनांक ६ ऑगस्ट, २०१६, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, महाराष्ट्र शासन

महोदय,

सध्या नाविन्य पूर्व तंत्रज्ञानाद्वारे मानवी अवयव प्रत्यारोपणाद्वारे विविध गंभीर आजारांवर उपचार साध्य होत आहेत. अवयवदाना अंतर्गत Live Organ donation द्वारे किडनी व लिव्हर प्रत्यारोपण करण्यात येते. तसेच कॅडेव्हर/मस्तिष्क स्तंभ मृत पश्चात किडनी, लिव्हर, लंग्ज्, हार्ट, त्वचा इत्यादी अवयव दान करण्यात येतात. सद्यस्थितीत राज्यभरात सुमारे १२,००० पेक्षा अधिक रुग्ण अवयव मिळण्याच्या प्रतिक्षेत आहेत.

मा. पंतप्रधान यांच्या विचारांनी प्रेरित होऊन मा. मुख्यमंत्री व मा. मंत्री, वैद्यकीय शिक्षण विभाग आणि सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी राज्य स्तरापासून तालुका स्तरापर्यंत महा अवयवदान अभियान दिनांक ३० ऑगस्ट ते १ सप्टेंबर, २०१६ या कालावधीमध्ये राबविण्याचा निर्णय घेतला आहे. अवयव मिळण्याच्या प्रतिक्षेत असलेल्या रुग्णांना नवजीवन देण्याच्या दृष्टीने हे एक महत्वाचे पाऊल असून अवयवदानासंबंधी मोठया प्रमाणात जनजागृती केली जाणार आहे.

दिनांक ३० ऑगस्ट, २०१६ रोजी या अभियानाचा शुभारंभ करुन अवयवदान जागृती महाफेरीचे (Walkethon) आयोजन करण्यात येणार आहे. दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ रोजी कार्यशाळा, अवयवदान चर्चासत्र, चित्रकला, निबंध स्पर्धा इ. चे आयोजन करण्यात येणार आहे आणि दिनांक १ सप्टेंबर, २०१६ रोजी अवयवदान अभियान नोंदणी शिबिराचे उद्घाटन व महा अवयवदान नोंदणी शिबिर आयोजित करणार असून प्रत्यक्ष अवयवदान केलेल्या अवयवदात्या कुटुंबांचा सन्मान करण्यात येणार आहे.

मा. कुलगुरू डॉ. संजय देशमुख हे राज्यस्तरीय अवयवदान महा अभियान समितीचे सन्माननीय सदस्य आहेत.

आपणा सर्वांना आवाहन करण्यात येते की, या महा अभियान कार्यक्रमामध्ये आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वंयसेवक, राष्ट्रीय छात्र सेनेतील छात्र, निरंतर शिक्षण उपक्रमातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचेसह सक्रिय सहभाग घ्यावा. दिनांक ३० ऑगस्ट, २०१६ रोजी आपल्या महाविद्यालयाच्या कार्यक्षेत्रातील तालुका / जिल्हा / राज्य स्तरीय शुभारंभाच्या कार्यक्रमातून उपस्थित राहन अवयवदान जागृती महाफेरी मध्ये सहभागी व्हावे.

पुढे...... २

दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ रोजी आपल्या महाविद्यालयात अवयवदान या विषयांवर तज्ञ व्यक्तींचे व्याख्यान, चर्चासत्र, चित्रकला, निबंध इ. स्पर्धांचे आयोजन करावे तसेच दिनांक १ सप्टेंबर, २०१६ रोजी अवयवदान नोंदणी करण्याचा कार्यक्रम हाती घ्यावा. तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर शासकिय, जिल्हा, उपजिल्हा, कुटीर रुग्णालये, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हाधिकारी, तहसिलदार यांना भेटून या उपक्रमात सहभागी व्हावे.

तसेच www.dmer.org व www.ztccmumbai.org या वेबसाईटवर अवयवदानाचे कार्ड ऑनलाईन करण्यासंबंधी सर्वांना अवाहन करावे.

अधिक माहितीसाठी १८००२७४७४४४ व १८००११४७७० या हेल्पलाईनवर संपर्क साधावा. अवयवदाना संबंधी माहिती, भित्तीपत्रकांच्या नमुना इ. www.nssmu.org.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. राष्ट्रीय सेवा योजना, समन्वयक प्रा. बाळासाहेब बिडवे यांची हया अभियानासाठी विद्यापीठाचे नोडल ऑफिसर म्हणून नेमणूक करण्यात आली आहे (भ्रमणध्वनी ९४२०५७४७०४).

आपण या महा अभियानात घेतलेल्या सहभागाबद्दल आयोजित केलेल्या कार्यक्रमाचा सविस्तर अहवाल राष्ट्रीय सेवा योजना, कार्यक्रम समन्वयक, मुंबई विद्यापीठ, विद्यापीठ विद्यार्थी भवन, चर्चगेट, मुंबई – ४०० ०२०, यांचेकडे सादर करावा.

(डॉ. अनिल पाटील)
संचालक,
मु.वि.वि.मं.